# इंडोरामा ओपन ॲक्सेस प्रकरणी लवादाच्या निर्णयास महावितरण आव्हान देणार

दि. ११ ऑगस्ट २०११ :

इंडोरामा कंपनीस ओपन ॲक्सेस देण्याप्रकरणी नवी दिल्ली येथील केंद्रीय विद्युत लवादाने नुकत्याच दिलेल्या निर्णयाला महावितरणने सामान्य ग्राहकांच्या हितासाठी सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याचे ठरविले आहे.

सदर प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट करताना महावितरणने म्हटले आहे की, एक मेगावॅटच्या वरील ग्राहकास ओपन ॲक्सेस देणे ही बाब विद्युत अधिनियम २००३ च्या तरतुदीनुसारच आहे. परंतु हे करीत असताना आयोगाने इंडोरामास कुठलाही क्रॉस सबसिडी सरचार्ज लावलेला नाही, यास महावितरणचा आक्षेप आहे. ज्या विद्युत अधिनियमात ओपन ॲक्सेसची तरतूद आहे त्याच अधिनियमात क्रॉस सबसिडीची विद्यमान पातळी कायम ठेवण्यासाठी क्रॉस सबसिडी सरचार्ज लावण्याचीही स्पष्ट तरतूद आहे. इंडोरामा प्रमाणेच इतर मोठ्या ग्राहकांना ओपन ॲक्सेस देण्यात आला तर राज्यातील कृषीपंपधारक, यंत्रमागधारक, दारिद्रयरेषेखालील ग्राहक, दरमहा १०० युनिटपेक्षा कमी वापर असलेले ग्राहक अशा लक्षावधी सामान्य वीज ग्राहकांना मोठ्या प्रमाणावर तातडीने फटका बसणार आहे.

ओपन ॲक्सेस प्रकरणी कोणतीही वीज वितरण कंपनी रेव्हेन्यू न्युट्रल असते. अर्थात यात वितरण कंपनीचे कोणतेही आर्थिक नुकसान होत नाही. परंतु विद्युत अधिनियम २००३ मध्ये अशी परवानगी देताना क्रॉस सबसिडी सरचार्ज लावण्याची तरतूद असतानाही त्या शिवाय परवानगी दिल्यास परवानगी मिळालेल्या ग्राहकाला कोट्यावधी रुपयांचा फायदा होऊ शकतो आणि आणि हे कोट्यावधी रुपये सर्वसामान्य ग्राहकांकडून वसूल करावे लागतात. परिणामी सर्वसामान्याचे वीजदर वाढून त्यांना मोठा फटका बसतो. म्हणून महावितरण सदर प्रकरणी सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या हितासाठी ही कायदेशीर लढाई लढत आहे, असेही महावितरणने पुढे म्हटले आहे.

दूरध्वनी क्र. २६४७४२११,
विस्तार क्र. ३६१७.

**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी**